# ‘मेट्रो-३’च्या स्थानकावरील मोकळ्या जागा देणार भाड्याने

## उत्पन्नाच्या नव्या मार्गाचा शोध सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिका सुरू होण्यापूर्वीच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) तिकीट विक्री व्यतिरिक्त अन्य माध्यमांतून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मेट्रो स्थानकावरील मोकळ्या जागा खाद्यपदार्थांचे स्टॉल, किरकोळ विक्री दालने आणि एटीएमसारख्या सुविधांसाठी देऊन त्यातून उत्पन्न मिळविण्यात येणार आहे. यासाठी या मेट्रो मार्गिकेवरील सुमारे १ लाख ९२ हजार चौरस फूट जागा एमएमआरसी भाड्याने देणार आहे.

मेट्रो मार्गिका उभारण्यासाठी आलेला खर्च केवळ तिकीट विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून उभारणे शक्य नाही. त्यामुळे २७ स्थानकांवरील मोकळ्या जागा भाड्याने देणे, स्थानक परिसरात जाहिरातींचे हक्क देणे, स्थानकांच्या नावांचे ब्रँडिंग करून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल, किरकोळ विक्री दालने, एटीएम यांसारख्या सुविधांसाठी जागा देण्यात येणार आहे. त्याबरोबरच कार्यालये, को-वर्किंग स्पेसेस, बँकांची शाखा, जिम, कोचिंग सेंटर, कुरिअर सेंटर आणि अन्य सेवा दालनांसाठीही या जागा भाड्याने दिल्या जाणार आहेत. काही स्थानकांसाठी हे कंत्राट पाच वर्षांकरिता, तर काहींसाठी ८ वर्षांसाठी दिले जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.